वर्ष १० वे
अंक - ४ था (जानेवारी ते मार्च - २०२१)

UGC CARE Listed Journal
ISSN 2231 - [illegible]

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

भाग - २



संपादक
डॉ. शिवाजी हुसे
मराठी विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.

- १० वे - अंक - चौथा - [illegible] मार्च - २०२०
- ISSN 2231 - 573X

# अनुक्रमांक (भाग - २)


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संत साहित्य अध्ययन आणि अध्यापन<br>प्रा. महादेव जगताप | १-३ |
| २ | संतसाहित्य आणि दलित साहित्य : एक अनुबंध<br>डॉ. रामचंद्र झाडे | ४-६ |
| ३ | संतांची प्रबोधन चळवळ<br>डॉ. कैलास इंगळे | ७-१० |
| ४ | ज्ञानेश्वरांचा चिद्विलासवाद, शंकराचार्यांचा मायावाद व रामानुजांचा विशिष्टाद्वैतवाद : अन्वय<br>डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | ११-२० |
| ५ | संत तुकारामांचे मध्ययुगीन मराठी साहित्यातील स्थान<br>प्रा. डॉ. अनिल गर्जे | २१-२५ |
| ६ | संत साहित्याची सार्वकालिकता<br>डॉ. जयदेवी पवार | २६-३० |
| ७ | संत तुकारामाचे सामाजिक आणि आध्यात्मिक योगदान<br>प्रा. डॉ. गजानन जाधव | ३१-३५ |
| ८ | समताधिष्ठित महानुभव पंथात दलिताचे स्थान<br>प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे | ३६-४० |
| ९ | संत साहित्यातील दलित जाणीव<br>डॉ. रामलिला सुदामराव पवार | ४१-४७ |
| १० | मराठवाड्यातील संत परंपरा : एक दृष्टिकोण<br>डॉ. उमेश मुंढे<br>प्रा. शिवचरण गिरी | ४८-५४ |
| ११ | संत ज्ञानेश्वराच्या पसायदानाची विधात्मकता - अध्ययन, अध्यापन, संशोधन<br>प्रा. डॉ. तुळशीराम चंद्रसेन ठाकरे | ५५-५८ |
| १२ | संत तुकारामांच्या अभंगातील पुरोगामित्वाची धारणा<br>प्रा. डॉ. बाबासाहेब शेंडगे | ५९-६२ |

# १. संत साहित्य अध्ययन आणि अध्यापन

प्रा. महाराज जगताप
मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रास्ताविक**

प्राचीन काळापासून भारतात ईश्वरनिष्ठ भक्तिसंप्रदयाची परंपरा अस्तित्वात होती. या परंपरेतूनच महाराष्ट्रात नाथ, वारकरी, महानुभाव, समर्थ, दत्त असे विविध संप्रदाय उदयास आले. या अनेकविध संप्रदयांपैकी 'वारकरी संप्रदाय' हा एक महत्वाचा संप्रदाय होय. या संप्रदायालाच 'भागवत संप्रदाय' असे संबोधले जाते. भागवत संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला. या संप्रदायात समाजाच्या सर्व थरातील भक्त एकत्र आले. ज्यांना समाजात माणुस म्हणून प्रतिष्ठा मिळाली नाही असे सर्व स्त्री - शुद्र या संप्रदायात भक्त म्हणून एकत्रित आले. त्यांनी भक्तीच्या पातळीवर समानतेचा अनुभव घेऊन सामाजिक व्यवहारावर पकड असलेल्या धर्मसंस्थेला शुद्ध करण्याचा प्रयत्न केला. समाजातील विविधता मिटवून एकता आणि समानता स्थापित करण्याचा प्रयत्नकेला. व्यक्तिचे चरित्र्य हा मूलभूत सुधारणेचा केंद्रबिंदू मानून चारित्र्य शुद्धीचा आग्रह धरला. कर्मकांडाला दूर सारून सर्वसुलभ असे भक्तीचे स्वरूप प्रस्थापित केले. त्यांची भक्तीची कल्पना सोपी, कर्मकांडाचा आग्रह न धरणारी आणि नैतिकतेच्या पायावर उभी असलेली होती. या संप्रदायाचे पंढरपूरचा विठ्ठल हे दैवत होते. असा हा वारकरीसंप्रदाय आजच्या विज्ञान युगात काही प्रमाणात नामशेष होतांना दिसून येत असला तरी या संप्रदायाने जे साहित्य निर्माण केले. त्याने मराठी साहित्याला समृद्ध केल्याचे दिसून येते. अशा या वारकरी संप्रदायाने निर्माण केलेल्या संत साहित्याचा परामर्श प्रस्तुत शोधनिबंधातून घेतला जाणार आहे.

**संत साहित्य**

'संत साहित्य' हे मध्ययुगीन साहित्य म्हणून ओळखले जाते. तेराव्या शतकापासून म्हणजेच संत ज्ञानेश्वरापासून सतराव्या शतकातील संत तुकाराम-निळोबा यांच्या साहित्यापर्यंत विठ्ठल भक्तीच्या परंपरेत जे साहित्य निर्माण झाली, त्या साहित्याला मुख्यत्वे संत साहित्य म्हणून संबोधले जाते. या साहित्याने सलग आणि प्रभावशाली वाङ्मयीन परंपरा निर्माण केल्याने दिसून येते. या साहित्याने वाङ्मयाच्या इतिहासाच्या संदर्भातच नव्हे तर महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाच्या संदर्भातही मोठं योगदान दिले आहे. संतांनी निर्माण केलेल्या संत साहित्यातून अध्यात्मिक समता प्रस्थापित झाली असल्याचे दिसून येते. भक्ती आणि तत्वज्ञान यांचा सुंदर मिलाफ संत साहित्यात पहावयास मिळतो. लोकाभिमुख व मानवतावादी धर्मविचाराचा प्रसार करण्याच्या प्रेरणेतून संतांनी साहित्य निर्मिती केली. या साहित्य निर्मिती मागे वैयक्तिक स्वरूपाची महत्त्वाकांक्षा नव्हती की व्यक्तिगत यशाची अपेक्षा नव्हती. तर त्यामागच्या प्रेरणा त्यांच्या व्यापक समाजजीवनात आणि संस्कृतीत पाहावयास मिळतात. "समाजाची अवनत स्थिती दूर होऊन, त्याचा विकास व्हावा, व्यक्तिच्या चारित्र्याचे उन्नयन

... एक व्हावा, धर्म चे मानवतावादी उदार स्वरूप स्पष्ट व्हावे, जातिभेदांनी विभागलेला समाज ते अडसर दूर सारून एक व्हावा, लोकांची जीवननिष्ठा बळावली जावी, धर्मपंथ आणि विविध दैवते यामुळे उडालेला गोंधळ लोकमनातून नष्ट व्हावा, लोकांची जीवननिष्ठा बळावली जावी, निरोगी स्वरूप प्राप्त व्हावे आणि देशी भाषेतून सर्वांपर्यंत ज्ञानाचा प्रसार व्हावा मुख्यतः या प्रेरणांनी संताचे वाङ्मय निर्माण ... आहे. त्या वारकरी संप्रदायाचा एक भाग म्हणून संत साहित्य निर्माण झाले. तो संप्रदायच मुळी समाजाच्या परमार्थिक ... निर्माण झालेला होता. संतांनी आपल्या साहित्यातून समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. पुराण, पारायण, प्रवचन या माध्यमांचा उपयोग करून लोकजागृतीचे आपले इप्सित साध्य केले. त्यासाठी अभंग, ओव्या, पदं, भूपाळी, गवळण, विराणी, श्लोक, स्तोत्र असे लोकवाङ्मयातले अनेक आविष्कार प्रकार त्यांनी वापरले. तसेच गोंधळ, रूपक, जागरण, लळीत, आरत्या, भारूड यासारख्या बहुजनांचा हाडीमासी खिळलेल्या नाट्यात्म व संगीतमय प्रकाराचा उपयोग अध्यात्माच्या प्रसारासाठी केला. संत साहित्यातून मुख्यतः तीन प्रमुख परंपरा पाहावयास मिळतात. त्यामध्ये तत्वविवरण, तत्वचिंतन यावर भर देणारी तत्वकवितेची एक परंपरा, दुसरी परंपरा कथेला, आख्यानाला महत्व देणारी कथाकवितेची, आणि तिसरी शृंगारकवितेची परंपरा या कथाकवितेच्या आणि शृंगारकवितेच्या खुणा दिसत असल्या तरी त्यांची व्याप्ती ... स्वरूपाची असल्याचे दिसून येते. त्यामानाने संत साहित्यामध्ये तत्वकवितेला प्राधान्य दिले जाते. मराठी साहित्यात संत ... हा मध्ययुगीन काळातील महत्वाचा घटक आणि तेवढाच महत्वाचा अविष्कार असल्यामुळे या साहित्याचे अध्ययन, अध्यापन कसे करावयाचे या संदर्भात येथे विचार केला जाणार आहे.

**संत साहित्य अध्ययन आणि अध्यापन —**

अध्ययन म्हणजे संस्कारग्रहण आणि वर्तनात परिवर्तन व ते परिवर्तन घडविण्यास साह्य करणे म्हणजे अध्यापन. "अध्यापन म्हणजे केवळ ज्ञानसंक्रमन नसून विद्यार्थ्यांच्या आकलनशक्तींचा व विचारशक्तीचा विकास करणारे त्यांना कौशल्याची प्राप्ती करून देणारे, त्यांना चांगल्या सवयी लावणारे, त्यांच्या अभिरूचीला व सौंदर्यदृष्टीचा विकास करणारे, जीवन विषयक दृष्टीकोनाची व मूल्याची जोपासना आणि त्यांच्या सर्जनशील शक्तीचा व विवेक बुद्धीचा विकास ... अध्यापनाचे कार्य म्हणजे अध्यापन होय." प्राचीन काळात धर्मज्ञान हे स्वर्गप्राप्ती, मुक्ती, पापनाश व पुण्यप्राप्ती यांचे ... मानले जात असे. हे धर्मज्ञान मिळवण्यासाठी गुरूकडून ते ऐकावयाचे व मुखोद्गत करावयाचे त्यासाठी पठण पाठण ... अस्तित्वात असल्याचे दिसून येते. तसेच त्याकाळी वेदत्रयींचे अध्ययन गुरूकडून संथा घेऊन होई. ते ग्रंथ कंठस्थ करण्याची पद्धत होती. परंतु वेदांगाच्या साहयाने वेदमंत्राचा अर्थ व विनियोग समजून घ्यावा लागे. श्रवणाबरोबरच मनन व निदिध्यास ... भर असे. पाठांतराच्या बरोबरीनंच निरीक्षण, अनुकरण, मार्गदर्शन व चिंतन यावर ही भर असल्याचे दिसून येते. कालांतराने अध्ययन अध्यापन पद्धती मध्ये बदल होत गेल्याचे दिसून येते. मध्ययुगात चिकित्सक अध्ययनाची परंपरा लोप पावली असे जाणवते. पाठांतराने वेदविद्या जिवंत ठेवण्याची धडपड करावी लागली. ब्रिटीश राजवटीत ब्रिटन मधील अध्यापन पद्धती ... शिक्षणात रूजल्याचे दिसून येते. तर आजच्या शिक्षणामध्ये स्वाध्याय, प्रकल्प, व्याख्यान, चर्चा, परिसंवाद, कृतिसत्रे, प्रयोग ... यांचा स्वळस्ळ प्रसार होताना दिसून येतो. विद्यार्थ्यांवर होणाऱ्या संस्कारात शिक्षकांचा वाटा मोठा असतो. ...

आचाराविचारांचा प्रभाव संस्कारक्षम विद्यार्थ्यांवर होत असतो. यासाठी प्राचीन काळातील आचार्य सदाचार संपन्न व शीलसंपन्न राहण्याचा प्रयत्न करत.

मध्ययुगीन काळातील संत साहित्याचा विचार करता या साहित्यातून सत्य, समानता, अहिंसा, शांतता, विश्वप्रेम, मैत्री, बुद्धिप्रामाण्य, श्रमप्रतिष्ठा, व्यवहारज्ञान, निसर्गप्रेम, समाजाप्रति असलेले उत्तरदायित्व, समाजऋण अशी अनेक मूल्ये पाहावयास मिळतात. या मूल्यांचा समावेश अध्ययन अध्यापनामध्ये असला पाहिजे. संत साहित्यात संत नामदेव, गोरा कुंभार, सावता माळी, चोखा मेळा, जनाबाई, संत तुकाराम, बहिणाबाई यांच्या साहित्यातुन त्या काळातील सांस्कृतिक ताणतणाव, तसेच त्या काळातील कौटुंबिक, सामाजिक आणि धार्मिक पेचप्रसंग प्रभावीपणे चित्रित झालेले दिसतात. त्यामुळे संत साहित्याचे अध्ययन अध्यापन करताना चारित्रात्मक पद्धतीचा उपयोग करता आला पाहिजे. साहित्याचे स्वरूप पाहून अध्ययन अध्यापनातुन करताना साहित्याच्या अंतरंगात शिरणं अधिक गरजेचं ठरत आहे. त्यासाठी संवेदनात्मक, भावनात्मक आणि विचारात्मक अनुभव घेणं गरजेचे आहे. साहित्यातून भावणारं संवेदनात्मक, भावनात्मक आणि विचारात्मक अर्थपूर्ण सौंदर्य यांचा आस्वाद आणि विश्लेषण आपल्या अध्ययन अध्यापनातून करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. साहित्याच्या अध्ययन, अध्यापनातून सौंदर्यांच्या, उत्पत्तींचा, भाषेचा शोध घेता आला पाहिजे. ज्ञानप्राप्ती बरोबरच ज्ञानाचे उपयोजन आणि कौशल्याची प्राप्ती यांनाही अध्ययन अध्यापनात महत्त्व दिले पाहिजे. तसेच अध्यापन करतांना अध्यापकाचा दृष्टीकोन लोकशाही स्वरूपाचा असला पाहिजे. अध्यापनातून साहित्याचे भाव सौंदर्य, रूपसौंदर्य संक्षेपाने उलगडून दाखवून शेवटी त्या विषयावर सविस्तर भाष्य करणे गरजेचे आहे. तसेच अध्यापन हे ज्ञानाकडून अज्ञाताकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे, पुर्णाकडून अपुर्णाकडे, परिचीताकडून अपरिचीताकडे, सामान्यांकडून विशिष्टाकडे असे असावे. म्हणून हे अध्ययन अध्यापन जुजबी ज्ञानाच्या आधारे परीक्षोपयोगी न होता अध्ययन अध्यापनाचे भान ठेवणे आवश्यक आहे, थोडक्यात साहित्याचा अभ्यास हा निर्जीव अक्षरांशी वा ग्रंथांशी केलेला यांत्रिक समझोता नसून जीवनसंपन्न व निकोप करणारी ती एक चैतन्यपूर्ण आत्मक्रिडा आहे. ती एक उच्च प्रकारचा आनंद आहे. अशी जीवंत अनुभूती आजच्या अध्ययन अध्यापनातून यायला हवी असे मला वाटते.

**संदर्भ**

१. 'साहित्य : अध्ययन आणि प्रकार' - (संपादक) श्री. पु. भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडुलकर, अंजली कीर्तने.

२. संशोधनाची क्षितीजे - (संपादक) भास्कर लक्ष्मण भोळे

३. 'संत साहित्य' - अरूणा ढेरे (य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक)

४. 'संत कविता एक दृष्टिकोन' - प्रकाश देशपांडे केजकर

५. 'अध्यापन व अध्यापन पद्धती' - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ